# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – १४ ऑक्टोबर २०१५

## मुंबई विद्यापीठात आज होणार 'डॉ.एपीजे अब्दुल कलाम विद्याधारीत कौशल्य विकास सेतू' प्रकल्पाचे उदघाटन

### विश्व विद्यार्थी दिन आणि वाचन प्रेरणा दिन होणार साजरा

मुंबई – १५ ऑक्टोबर,भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने मुंबई विद्यापीठामध्ये आज *"डॉ.एपीजे अब्दुल कलाम विद्याधारीत कौशल्य विकास सेतू"* या प्रकल्पाचे उदघाटन होणार आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्वाकांक्षी स्कील इंडिया मिशन कार्यक्रमाच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांच्या पुढाकाराने मुंबई विद्यापीठात "डॉ.एपीजे अब्दुल कलाम विद्याधारीत कौशल्य विकास सेतू " प्रकल्पाला आजपासून सुरुवात होणार आहे.विद्यार्थी केंद्रीत अशा या अभिनव उपक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून केली जाणार आहे.विशेष म्हणजे या प्रकल्पाच्या अनुषंगाने राज्यशासनाच्या चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टमसाठी सुध्दा हा प्रकल्प महत्वपूर्ण ठरणार आहे.

मुंबई विद्यापीठाच्या या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या सहाय्याने आणि राष्ट्रिय सेवा योजनेच्या माध्यमातून तरुणांमध्ये कौशल्यविकास,सर्वांगिण विकास आणि अंगभूत गुणांना वाव मिळावा पर्यायाने समाजातील शेवटच्या घटकापर्यंत माहिती आणि ज्ञानाची दारे उघडली जाणार आणि समाजातील मागास घटकाना मुख्य प्रवाहात आणून त्यांना सक्षम आणि कौशल्यप्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी हा प्रकल्प महत्वपूर्ण आहे.

भारत सरकारच्या मेक इन इंडिया,स्टार्ट अप इंडिया आणि स्टॅंड अप इंडिया या महत्वाकांक्षी कार्यक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना विद्यार्थी दशेमध्येच समाजसेवेचं व्रत आणि समाजसेवेचे धडे दिल्यास ,तसेच विद्यापीठ स्तरावर तरुणांना कौशल्यआधारीत प्रशिक्षण दिल्यास आणि समाजबांधिलकी जोपासल्यास विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा फायदा हा समाजातील शेवटच्या घटकाना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नक्कीच होऊ शकेल .तसेच जागतिक समस्यांचे स्थानिक पातळीवर निराकरण करणे,अंगभूत गुणांचा विकास करण्यावर भर दिला जाणार आहे. याद्दष्टिकोनातून सुरुवातीला मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील ४८ हजार विद्यार्थी हे या प्रकल्पामध्ये सहभागी होणार आहेत.यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांना ४ क्रेडीट मिळविण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाणार आहे. भारतरत्न डॉ एपीजे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी म्हणजेच १५ ऑक्टोबर रोजी या प्रकल्पाचे उदघाटन मुंबई विद्यापीठात होणार आहे.

२०१० मध्ये भारतरत्न एपीजे अब्दुल कलाम यांचा ७९वा  वाढदिवस युनोने जागतिक विद्यार्थीदिन म्हणून जाहीर केला आहे.तसेच या वर्षी महाराष्ट्र शासनाने कलामसरांच्या वाचनप्रेमाचे स्मरण म्हणून १५ ऑक्टोबर हा दिवस   *वाचन प्रेरणा दिवस*  म्हणून साजरा करावा असे आवाहन केले आहे.यानिमित्ताने विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन केंद्राच्या पुढाकाराने वाचन प्रेरणा दिन,ज्ञानसरीता या माहिती दुव्याचे अनावरण,चित्रसाहित्य,काव्यगायन आणि पुस्तक प्रदर्शन इ.कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये कलामसरांच्या साहित्यातील निवडक उता-यांच्या वाचनाने या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.या उपक्रमातील सहभागी वाचकांना प्रशस्तीपत्रक देण्यात येईल,तसेच वाचल्या गेलेल्या साहित्यावर पुढे ऑनलाईन क्वीझचे नियोजन करण्याची विद्यापीठाची योजना आहे.तसेच या दिनाचे औचित्य साधून चित्रसाहित्य स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये कलामसरांचे रंग,माझी जागतिक विद्यार्थीदिनाची कल्पना आणि वाचनप्रेरणादिनाची प्रेरणा या विषयांवर भित्तीपत्रक (पोस्टर) बनवून स्पर्धेसाठी सादर करावयाचे आहे.तर डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या कवितांचे गायन हा या कार्यक्रमातील लक्षवेधी भाग असणार आहे.त्याचबरोबर विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरु ग्रंथालयाच्या सयुक्त विद्यमाने डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्याशी निगडीत ज्ञानभंडाराचे प्रदर्शनाचे आयोजन केले जाणार आहे.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)